झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्स:९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनी: ०२२-२६५९०५१९/०४०५/१८७९/०९९३
Email: info@sra.gov.in
क्र.झोपुप्रा/मुकाअ/परिशिष्ट-२/२००४/७०६
दिनांक : 9 SEP 2004

परिपत्रक - ६६

विषय : परिशिष्ट-२ वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेचे परिशिष्ट-२ तयार करण्याचे काम संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत पार पाडण्यात येते. संबंधित संस्थेचे सक्षम अधिकाऱ्याने मंजूर केलेले परिशिष्ट-२ या कार्यालयाच्या आदेशान्वये संस्थेच्या सूचना फलकावर, संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यालयात व प्रत्यक्ष योजना कार्यान्वीत होणार असलेल्या भूखंडावर प्रसिध्द करण्याच्या सूचना देण्यात येतात. प्राधिकरणाचे असे निदर्शनास आले आहे की, बहुतांशी सभासदांना हे परिशिष्ट-२ प्रसिध्द झाल्याचे समजून येत नाही. त्यामुळे परिशिष्ट-२ निर्गमित झालेल्या माहिती अभावी संबंधित झोपडीधारक या कार्यालयात त्यांचे परिशिष्ट-२ मधील अस्तित्व जाणून घेण्यासाठी गर्दी करतात. वरील परिस्थिती टाळण्यासाठी, योजनेची माहिती सर्व संबंधितांना प्राप्त होण्याच्या दृष्टिने सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त झालेले परिशिष्ट-२ झोपडीधारक वाचतील अशा एका वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे गरजेचे आहे. त्यामुळे दि. १/८/२००४ पासून या कार्यालयात प्राप्त होणारे परिशिष्ट-२ विकासकाने स्वखर्चाने झोपडीधारक साधारणतः वाचतात अशा एका मराठी वृत्तपत्रात प्रसिध्द करणे बंधनकारक राहिल. परिशिष्ट-२ वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याची जबाबदारी विकासक व सर्व संबंधित संस्थाकडे राहिल.

(स्वाक्षरी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रत :

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
२. मा. सचिव यांचे स्वीय सहाय्यक
३. मा. वित्त नियंत्रक यांचे स्वीय सहाय्यक
४. संबंधित विकासक
५. संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था
६. प्रशासन निवड नस्ती

२/- सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या नियंत्रणाखालील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून परिपत्रकाचे पालन करण्याबाबत सुचित करावे.

C:\BK\Adhi Suchana\Paripatrak-66.doc